# मुलांचे शिक्षक व त्याचे मदतनीस यांच्यासाठी मार्गदर्शकतत्वे सुरुवात करा

"प्रिय प्रभु, मुलांवर तुझे खूप प्रेम आहे. त्यांना शिकवण्यासाठी तू मला चांगली तयारी करण्यास साहाय्य कर."

**1. पौल तीमथ्य मुलांचा अभ्यास याचा उपयोग करा.**



- पौल तीमथ्य अभ्यासाचे संच आहेत. त्यामध्ये मेंढपाळांसाठी व मुलांसाठीचे अभ्यासक्रम असून दोघांचा विषय एकच असतो, मुलांसाठीच्या अभ्यासात वर 'मुलांसाठी' असे नमूद केलेले आहे.
- मुले आणि मोठी माणसे एकाच विषयावरील शिक्षण घेतात.
- पौल तीमथ्य अभ्यासामुळे मुलांना मोठ्या माणसांच्या विषयानुरूप पवित्र शास्त्रातील कथावृत्तांत उपासना सभेच्या वेळी मोठ्या माणसांसमोर नाट्यरूपाने सादर करता येतो.

**2. मुलांच्या गरजानुसार अभ्यासक्रमातील कार्यक्रम निवडा.**

- मुलांच्या अभ्यासक्रमांमध्ये अनेक कार्यक्रम आहेत. हे पर्याय आहेत यातील सध्याच्या गरजा आणि तुमचा वेळ यानुसार योग्य असणारे कार्यक्रम निवडा आणि उर्वरित कार्यक्रमांकडे दुर्लक्ष करा.

**3. उपासना सभेमध्ये मोठ्या माणसांसमोर सादर करावयाचे मुलांचे कार्यक्रम मुलांकडूनच तयार करून घ्या.**

- लहान मुलांना एकत्र उभे करून त्यांना बोलायला किंवा गाणे गायला सांगा.
- पाठांतराची वचने, लहान नाटिका, कविता, गाणी किंवा छोटेसे वाचन यासाठी असे करता येईल.
- काही मुले शांत व लाजाळू असतात. इतरांसोबत एकत्रितपणे एखादी गोष्ट केल्याने त्यांनाही भाग घेण्याची संधी मिळते.

**4. लहान मुलांना साधी सोप्या सुरावटीची गाणी म्हणायला सांगा**

- मुलांना आनंद वाटेल अशा सुरावटीची गाणी पाठामध्ये सामील करा.
- आठवड्यातील विषयानुरूप एखादी साधी कविता मोठ्या मुलांना लिहिण्यास सांगा.

**5. लहान मुलांना हावभावांची कृती पुन्हा करण्यास सांगा.**

गोष्ट सांगतांना किंवा गाणी गातांना मुलांना त्यांची बोटे हात वा पाय ह्यांचा उपयोग करण्यास आवडते. उदाहरणार्थ, दावीद गल्याथाचा वध करतो हा कथावृत्तांत सांगण्यामध्ये त्यांना सहभागी करून घ्या.

- गल्याथ इस्राएल लोकांना तुच्छ लेखत असताना मुलांनी हात उंचावून हवेत मुठी वळून हालवावेत.
- दावीद गोफणीतून दगड मारतांना मुले स्वत:च गोफण मारत असल्यासारखे हवेत हात फिरवतील.
- गल्याथ खाली पडतो तेव्हा मुले मोठ्याने ओरडून खाली पडतील, इत्यादी. लहान मुलांना पुनरावृती आणि आवाज करायला आवडते. उदाहरणार्थ;
- समजा, तुम्ही किंवा मुले चांगल्या शोमरोन्याचा कथावृत्तांत सांगत असाल तर मुलांना उतारशाळेकडे जाणूाया गाढवाच्या पायांचा आवाज काढायला सांगा. "कलॉप! कलॉप क्लॉप!"

- आदाम व हव्वा ह्यांचा कथावृत्तांत सागतांना सर्पाचा उल्लेख येईल त्यावेळी मुलांना सर्पाचा आवाज करायला सांगा.

**6. मोठ्या मुलांनी लहान मुलांना शिकविण्यासाठी मदत करावी.**

- मोठ्या मुलांना त्यांनी काय करायचे हे स्पष्ट करून सांगा.
- त्यांना एका वेळी एकच गोष्ट करायला सांगा. ह्या गोष्टी सोप्या असाव्यात.

**7. मुलांना मोठ्या माणसांबरोबर उपासना करण्यात साहभागी करा.**

- उपासना सभेमध्ये शक्य होईल तितके मुलांना सहभागी करून 'कौटुंबिक' वातावरण निर्माण करा.
- मुलांच्या अभ्यासामध्ये त्यांनी उपासने दरम्यान मोठ्या माणसांसमोर सादर करावयाच्या गोष्टींच्या तयारीचा समोवेश आहे.
- ह्या गोष्टींची चांगली तयारी करून प्रथम ते मुलांसमोर सादर करा.

**8. लहान गटांमध्ये मुलांचे म्हणणे ऐका आणि त्यांना ख्रिस्तामध्ये वाढण्यास मदत करा.**

- पी. टी. एल. टी. अभ्यासक्रमांमध्ये तीन ते पाच जणांचे लहान लहान गट उपासनेदरम्यान तयार करण्याची तरतूद आहे. त्यामुळे लोकांना एकमेकांशी बोलून प्रार्थना करता येते. यातील काही गटांमध्ये मुलांना सहभागी करून घेता येईल.
- या गटांमधील काही मोठ्या माणसांना मुलांशी बोलून प्रार्थना करण्यास तयार करा.
- पवित्र शास्त्राच्या अभ्यासानंतर असे करा. मग तुम्हांला त्यावरील प्रश्न विचारता येतील किंवा चर्चा करता येईल.
- आम्ही एकत्र येतो तेव्हा अनेक प्रकारे एकमेकांची सेवा करावी आणि शिकवावे असे नवा करार सांगतो यात मुलेही आली. आम्ही असे करतो तेव्हा पवित्र आत्मा प्रभावीपणे कार्य करतो.

**9. लहान गटांमध्ये मुलांशी बोलताना त्यांना कशी मदत करता येईल ते पाहा.**

- त्यांना विचारा जसे, "कथावृत्तांतातील कोणती व्यक्ती तुम्हांला सर्वात अधिक आवडली?" "का?"
- "तुमच्या घरी. शाळेत किंवा शेजारी काही समस्या आहेत का? असल्यास आपण त्याकरिता प्रार्थना करू."
- "पुढील आठवड्यात तुम्हांला कोणाला मदत करता येईल किंवा दया दाखवता येईल?" "तुम्ही काय कराल?"
- "तुम्ही तुमच्या आईला व वडिलांना बरे वाटेल अशी कोणती गोष्ट कराल?"
- "तुमच्या भावाला किंवा बहिणीला बरे वाटेल अशी कोणती गोष्ट तुम्ही पुढच्या आठवड्यात कराल?"

**10. मुलांनी पवित्र शास्त्रातील कथावृत्तांतांचे नाट्यीकरण करावे.**

- मुलांच्या अभ्यासक्रमात छोट्या छोट्या नाटिका दिल्या आहेत. याचा सराव त्यांनी प्रथम मुलांच्या सभांमध्ये करावा. आणि मग पुन्हा मोठ्या माणसांच्या मदतीने मुख्य उपासनेमध्ये ही नाटिका सादर करावी.
- पवित्र शास्त्रातील कथावृत्तांतांचे नाट्यीकरण करायला मुलांना आवडते. नाट्यीकरणातून सादर केलेले आध्यात्मिक सत्य त्यांच्या अधिक चांगले लक्षात राहते. सराव करणे हा शिकविण्याचा एक भाग असल्याने मुलांना शिकण्याच्या वेळात सराव करायला लावू नये. मुलांना दीर्घ मोठे मोठे संवाद पाठ करायला न देता नाटिका छोटी आणि सोपी असल्यास त्याचा प्रभाव अधिक चांगला पडतो.

- उदाहरणार्थ, मुलांच्या सभांमध्ये यहोशवा मूर्तीपूजक कनानी लोकांशी लढाई करतो. याविषयी शिकविताना शिक्षक काही मुलांना, "तुम्ही यहोशवाचे सैनिक व्हा" तर इतरांना "तुम्ही कनानी सैनिक व्हा" असे सांगतील.
- नाट्यीकरण करावयाच्या कोणत्याही कथावृत्तांतातील सर्व भूमिका करण्यास पुरेशी मुले नसतील तर शेजारच्या मुलांची मदत घ्या किंवा त्या कथावृत्तांतातील भू व्यक्तिरेखा सांगून तिची भूमिका वाचून दाखवा.
- शिक्षकांनी मुलांना संवाद म्हणायला मदत करावी; परंतु कृती मात्र त्यांनाच करू द्या. ते काही वेळ इकडे तिकडे धावपळ करतील आवाज काढतील, ढाल व तरवारी म्हणून उपयोगात आणण्यासाठी काही वस्तू शोधून आणतील आणि मग अभिनय करतील. त्यांना शांत करायला थोडा वेळ लागेल; पण ते या पद्धतीने अधिक चांगल्या प्रकारे शिकतात आणि त्यांना हे असे फार आवडते.
- मुलांना त्यांचे नाट्यीकरण सादर करता यावे यासाठी उपासनेच्या पुढ्यायांशी बोलून तशी व्यवस्था करा. असे प्रत्येक आठवड्यात करा.
- सर्व भूमिका करण्यासाठी पुरेशी मुले नसतील तर शेजारच्या मुलांची मदत घ्या. यामुळे त्यांनाही ख्रिस्ताची ओळख होण्यास मदत होईल.
- साधारणपणे मोठ्या मुलांना संवादातील प्रत्येक शब्द तोंडपाठ नसला तरी नेमके काय म्हणायचे याची साधारण कल्पना त्यांना असते. प्रथम हे थोडे कठीण वाटेल; पण जसा त्यांना सराव होईल तसे ते त्यांची कल्पनाशक्ती वापरण्याला प्राधान्य देतील आणि नाट्यीकरण अधिक प्रभावी परिणामकारक होईल. काही मुले नेहमी संवाद पाठ करण्यास प्राधान्य देतील. त्यांना हवा तो पर्याय निवडू द्या.

**11. तुम्ही शिकवलेल्या गोष्टी चित्ररूपाने वा वस्तूरूपाने दाखवा.**

- वस्तू. उदाहरणार्थ: येशू जगाचा प्रकाश आहे हे शिकवितांना, मुले पवित्र शास्त्रातील वचन वा कविता म्हणतांना पेटवलेली मेणबत्ती हातात धरतील.
- चिन्हे. उदाहरणार्थ: मुले चर्चेच्यावेळी काढलेली चिन्हे हातात धरतील. येशू एका आंधळ्याला बरे करतो याविषयी सांगताना मुले "देव प्रीती आहे" असे लिहिलेली पट्टी हातात धरतील. तुम्हांला वाटले तर तीन मुलांकडे. "देव" "प्रीती" व "आहे" असे तीन शब्द वेगवेगळ्या पट्ट्यांवर लिहून द्या.
- नाच. उदाहरणार्थ इस्राएल लोक तांबड्या समुद्रातून कोरड्या भूमीवरून चालत गेले याबद्दल सांगताना मुलांना याचा आनंद नाचून व्यक्त करायला सांगा तर त्यांनी नंतर काय केले त्याविषयी एखाद्याला निर्गम 15 मधून वाचायला सांगा. सैतान हव्वाबाईला मोहात पाडतो हे दाखविण्यासाठी मुले एक ओळ तयार करतील. त्यात उंच मुले पुढे असतील. प्रत्येक मुलगा मुलगी त्याच्या पुढे असणाऱ्याच्या खांद्यावर हात ठेवतील. आणि संपूर्ण खोलीत सापासारखा 'फुस्स' असा आवाज काढीत गोल फेरी मारतील.

साध्या सहज उपलब्ध होतील अशा गोष्टीचा उपयोग करा. तुमच्या कल्पनाशक्तीचा वापर करा. साध्या गोष्टींतून पवित्र शास्त्रातील सत्ये उत्तम प्रकारे मांडता येतात. मुलांना दररोज दिसणाऱ्या गोष्टींचाच उपयोग करा. त्यामुळे ह्या गोष्टी दिसल्यावर त्यांना देवाची आठवण होते. त्यांना वस्तू हातात धरून त्याविषयी बोलू द्या. उदाहरणार्थ:

गवत – येशूच्या दृष्टांतामधील बी पेरणारा शेतकरी

चेहऱ्यांचे चित्र काढलेले खडक – चेहऱ्यांवर तिरस्कार असणारे वाईट लोक, चांगले लोक दाखविणारे हसरे चेहरे.

सुकलेली पाने – येशूने फळ न देणाऱ्या अंजिराच्या झाडाला शाप दिला (मार्क 11:12–24).

हिरवी पाने - चांगले लोक योग्य पाणी मिळलेल्या झाडासारखे असतात (स्तोत्र 1).

झाडू - पवित्र आत्मा आमच्या जीवनांतील पातके झाडून दूर लोटतो.

साबणाची वडी - ख्रिस्ताचे रक्त हा एकच साबण आमची पातके धुऊन टाकतो.

पाण्याचे फूलपात्र - येशूने शोमरोनी स्त्रीला जीवनी पाण्याचे अभिवचन दिले.

एकत्र जोडलेल्या दोन काठ्या - वधस्तंभ.

कागदाचा मासा - मासे धरणारा पेत्र.

पेन्सिल-आमची नावे जीवनाच्या पुस्तकात लिहिलेली आहेत.

फळांची बशी - आत्म्याची फळे (गलती 5:22-23)

भात वाढलेले ताट - ख्रिस्ता बरोबरची आमची लग्नाची महान मेजवानी (प्रकटी 19:6-10).

एका बाजूला अणकुचीदार असलेली मोठी काठी - शिपायांनी वधस्तंभावरील येशूच्या कुशीत भाला भोसकला.

हातोडा किंवा करवत - नोहा व त्याच्या मदतनीसांनी अनेक वर्षे खपून तारू बांधले.

फूल - देवाची सुंदर निर्मिती (उत्पत्ती 1) किंवा देवाची तरतूद (लूक 12:22-32).

काटेरी झाड वा फांदी - मनुष्याने प्रथम पाप केले तेव्हा देवाने दिलेला शाप (उत्पत्ती 3:17-19).

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net